साप्ताहिक

न्यायस्वातंत्र्य समता

पत्रकारितेचे मूल्य जतन करणारे वृत्तपत्र...

संपादक : रमेश अ. शेळके कार्यकारी संपादक : ॲड. चंद्रकांत गायकवाड

RNI NO.: MAHARAR/2010/36016
Website : nyayswatantryasamata.weebly.com

● वर्ष : ७ वे ● अंक : १२ वा ● सोमवार दि. १ ते ७ मे २०१७ ● पुणे ● पाने : ४ ● किंमत २ रुपये

NEWS वाचकांसाठी

अप्रकाशित साहित्य प्रकाशित केले जाईल. व आपले लेख / बातम्या जाहिरातीसाठी संपर्क साधा.
पत्ता : सिद्धीविनायक केशर बिल्डिंग, ३०५, तीसरा मजला,४३३/अ, सोमवार पेठ, पुणे - ४११ ०११
Mob.: 9561924323/8554891279
Email : remesh.shelke24@yahoo.com
Web : nyayswatantryasamta.weebly.com

सुमीत कुमार 'हिंद केसरी'

पुणे : श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने पुणे येथील स्व. बाबुराव सणस क्रीडांगणावर सुरू असलेल्या भारतीय शैली अजिंक्यपद व हिंद केसरी किताब कुस्ती स्पर्धेच्या अंतिम लढतीत रेल्वेचा सुमित याने महाराष्ट्राचा व पुणे जिल्ह्याच्या अभिजित कटके याचा ९-२ गुणांनी पराभव करत मानाची गदा पटकावली.

अंतिम लढतीत पहिल्या ७ मिनिटांच्या फेरीत अभिजित ६-२ ने पिछाडीवर होता. पहिल्या मिनिटात सुमितने अभिजितला आखाड्याबाहेर ढकलत १ गुण मिळवला. त्यानंतर सुमितने उत्कृष्ट डाव टाकत २ गुणांची कमाई केली. त्यानंतर अभिजितने चपळाई दाखवत २ गुण मिळवले ; परंतु सुमितने पहिल्या डावात अभिजितला अतिरिक्त गुण मिळवायची संधी दिली नाही. खेळाच्या दुसर्या सत्रात सुमितने आक्रमक धोरणाचा अवलंब करीत सामन्यावरील आपली पकड आणखी मजबूत करीत ९-२ ने विजय मिळवत हिंद केसरी किताब पटकाविला.

> उपांत्य फेरीपूर्वीच मला विजेतेपदाची खात्री होती. आंतरराष्ट्रीय स्पर्धामधील अनुभवाचा मला नेहमीच फायदा झाला आहे. त्यातच उपांत्य साखळी लढतीत मी अभिजीतला सहज हरविले होते. त्यामुळे अंतिम फेरीत विजय आपलाच आहे, अशी खूणगाठ मी मनाशी बांधली होती.
> **- सुमीत कुमार**, हिंदकेसरी

पुरंदर विमानतळाच्या भूसंपादनासाठी चार पर्याय

प्रकल्पग्रस्तांना मोबदल्यासाठी पर्याय निवडीचे स्वातंत्र्य

मुंबई (प्रतिनिधी) : पुरंदर येथील छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादन प्रक्रियेसाठी चार पर्याय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्य केले आहेत. पुरंदर विमानतळासाठी ज्या शेतक-यांची जमिन जाणार आहे, अशा प्रकल्पग्रस्तांना मोबदल्यासाठी पर्याय निवडीचे स्वातंत्र्य देण्यात येणार आहे. यासंदर्भातील कार्यवाही करण्यासाठी पुणे जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार प्रदान केले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी सह्याद्री अतिथीगृह येथे पुरंदर येथील छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादन प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला. या बैठकीस अन्न व नागरी पुरवठा मंत्री गिरीश बापट, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव प्रवीण परदेशी, प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर, पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी, जिल्हाधिकारी सौरभ राव यांच्यासह सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते. पुरंदर येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादन प्रक्रियेचे आणि मोबदल्यासंदर्भात चार पर्याय मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासमोर सादर करण्यात आले. यामध्ये संपूर्ण मोबदला एकरकमी अदा करणे, निर्वाह भत्त्यासह विकसित भूखंडाचा परतावा देणे (अमरावती-आंध्रप्रदेश येथील विमानतळ विकास मॉडेल), जमिनीच्या बदल्यात पर्यायी जमीन देणे आणि मगरपट्टा सिटी, कोची विमानतळाच्या धर्तीवर विमानतळ विकास कंपनीमध्ये जमीन मालकाला भागधारक करून घेणे या पर्यायांचा समावेश होता. या चारही पर्यायांवर आजच्या बैठकीत चर्चा होऊन या चारही पर्यायातून कोणताही पर्याय निवडण्याचे स्वातंत्र्य प्रकल्पग्रस्तांना देण्याचा निर्णय घेण्यात आला.



पुणे येथील सध्याच्या विमानतळावरील प्रवाशांचा भार पाहता पुण्यात आंतरराष्ट्रीय विमानतळाची नितांत गरज असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले. २०१५-१६ मध्ये पुणे शहरातील विमान प्रवाशांच्या संख्येत त्या आधीच्या वर्षीच्या तुलनेत २९.३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. कृषी उत्पादने, स्मार्ट सिटी आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील हब अशा विविधांगानी पुणे शहराचे महत्व दिवसेंदिवस वाढत आहे. ही मागणी तसेच प्रवाशांची सोय लक्षात घेऊन पुण्यात पुरंदर येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ विकसित करण्याचे महाराष्ट्र शासनाने निश्चित केले आहे. या विमानतळासाठी सहा स्थळांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यामध्ये पुरंदर येथील जागा तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्याने एअरपोर्ट ऍथॉरटी ऑफ इंडियाने त्यास मान्यता दिली असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

■ शिर्डी विमानतळावरील सुविधांची पाहणी करा !

२०१८ मध्ये श्री साई समाधी शताब्दी सोहळा साजरा होणार आहे. त्यापार्श्वभूमीवर शिर्डी विमानतळावरील पायाभूत सुविधा व सोयींची सर्व विमान कंपन्यानी जाऊन पाहणी करावी असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. या बैठकीस विविध विमान कंपन्यांचे प्रतिनिधी आणि वरिष्ठ शासकीय अधिकारी उपस्थित होते. सोहळ्यासाठी जगभरातून तसेच देशाच्या कानाकोपऱ्यातून भाविक फार मोठ्या संख्येने शिर्डीत दाखल होणार आहेत. साधारणत: ४२ देशातील जागतिक दर्जाच्या मान्यवरांनी त्यांची उपस्थितीही नोंदवली आहे. ही बाब लक्षात घेता सर्व विमान कंपन्यांनी या सोहळ्यासाठी त्यांची सेवा देतांना शेड्यूल आणि वेळापत्रक निश्चित करावे, असे निर्देश दिले. शासनाने शिर्डी विमानतळावर २५०० मीटरची धावपट्टी विकसित केली आहे ती ३२०० मीटरपर्यंत वाढवण्याचे नियोजन आहे. त्यामुळे लवकरच येथे नाईट लॅण्डिंगची सुविधा उपलब्ध होईल अशी माहिती ही आजच्या बैठकीत देण्यात आली.

अवाजवी शुल्कवाढ केल्यास कायदेशीर कारवाई करणार : विनोद तावडे

पुणे (प्रतिनिधी) : येत्या शैक्षणिक वर्षात पालक-शिक्षक समितीच्या मान्यतेशिवाय शाळेने शुल्कवाढ करू नये. ही शुल्कवाढ १५ टक्क्यांपेक्षा अधिक नसावी. याबाबत तक्रारी आल्यास संबंधित शाळांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी राज्यातील शाळांना दिला आहे.

शालेय शिक्षण विभाग व श्यामची आई फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने तयार करण्यात आलेल्या www.mahacareermitra.in या पोर्टलचे तसेच mahacareermitra या मोबाईल ॲपचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी तावडे बोलत होते. राज्य शिक्षण मंडळाचे अध्यक्ष गंगाधर मम्हाणे, श्यामची आई आई फाऊंडेशनचे अध्यक्ष भारत देसडला, संचालिका शितल बापट आदी उपस्थित होते.

राज्य सरकारने दहावीतील विद्यार्थ्यांसाठी सुरु केलेल्या कल चाचणीचे चांगले परिणाम दिसून येत आहेत. यामुळे पालकांना आपल्या मुलाचा कल कोणत्या अभ्यासक्रमाकडे आहे, याची माहिती होते. यातून मुलांना चांगल्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येतो. विद्यार्थ्यांना चांगले करिअर घडविता येते, असे तावडे म्हणाले.

या वेबपोर्टलमुळे विद्यार्थी, पालक यांना कल अहवालानुसार त्या त्या क्षेत्रातील व्हीडीओज पाहून तज्ज्ञांचे मार्गदर्शन व लेख वाचून अधिक माहिती मिळू शकते. राज्यातील १९ हजार पेक्षा अधिक शैक्षणिक संस्था, ८३ हजार अभ्यासक्रम उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. त्यानुसार जिल्ह्यातील शासनमान्य महाविद्यालयातून विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेता येतो, अशी माहितीही तावडे यांनी दिली.

आरक्षणामुळे ब्राह्मण मुलांना शिक्षणासाठी परदेशात जावे लागते: मुक्ता टिळक

या वादावर त्यांनी असे दिले स्पष्टीकरण

पुणे (प्रतिनिधी) : आरक्षणामुळे ब्राह्मण मुलांना शिक्षणासाठी परदेशात जावे लागत असल्याचे वादग्रस्त विधान पुण्याच्या महापौर मुक्ता टिळक यांनी केले आहे. नाशिकमध्ये चित्पावन ब्राम्हण संघाच्या परशुराम वेद पुरस्कार सोहळ्यात त्यांनी हे वक्तव्य केल्याची बातमी दैनिक सकाळने दिली आहे.

यावर मुक्ता टिळक यांनी स्पष्टीकरण दिले आहे. त्यांनी दिलेले स्पष्टीकरण पुढील प्रमाणे -माझ्या वक्तव्याचा विपर्यास केलेला आहे.

जे नोकरी-व्यावसायासाठी बाहेर गेले आहेत, त्यांना इथे येण्यासाठी पूरक वातावरण तयार करायचे असेल, तर नोकरी, व्यावसाय आणि उद्योगाच्या अधिक संधी उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत आणि त्या करण्याची जबाबदारी गेल्या ६० वर्षात झालेली नाही. फक्त सरकार नाही, तर समाजाचाही ती जबाबदारी आहे, असे आपण नाशिकमध्ये म्हटल्याचे मुक्ता टिळक यांनी एबीपी माझा या वृत्तवाहिनीशी बोलताना सांगितले. शिवाय, आरक्षणाला आमचा कुणाचाच विरोध नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

खोलीकरणामुळे पाणी क्षमतेत होणार वाढ

सुमारे दोन कोटी लिटर पाणी क्षमतेचा तलाव

परिसरातील शंभर एकर शेतजमिनीला होणार फायदा

मंचर (प्रतिनिधी) : शेतकऱ्यांनी पाण्याचा अपव्यय न करता ठिबक सिंचन प्रणालीचा जास्तीत जास्त वापर करावा, असे आवाहन आंबेगाव तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष नीलेश थोरात यांनी केले आहे.

शेवाळवाडी (ता. आंबेगाव) येथे मोरडे फूड्स कंपनी आणि ग्रामपंचायत शेवाळवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने तलाव खोलीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. त्या कामाचा शुभारंभ मंडल अधिकारी दीपक मडके, तलाठी हेमंत भागवत,राष्ट्रवादी युवक काँग्रेस अध्यक्ष नीलेश थोरात यांच्या हस्ते झाला. त्यावेळी झालेल्या कार्यक्रमप्रसंगी नीलेश थोरात बोलत होते.

खोलीकरणाच्या कामामुळे सुमारे दोन कोटी लिटर पाणी क्षमतेचा तलाव या ठिकाणी निर्माण होणार असून, त्याचा फायदा परिसरातील शंभर एकर शेतजमिनीला होणार आहे. या तलावातून निघणारा गाळ शेतकऱ्यांना स्वखर्चाने घेऊन जाता येणार आहे, अशी माहिती सरपंच उज्जला थोरात यांनी दिली. यापूर्वी मोरडे फूड्स, तसेच रोटरी क्लब मंचरच्या माध्यमातून शेवळवाडीतील तीन तलावांचे खोलीकरण करण्यात करण्यात आले होते. त्याचा मोठा फायदा या परिसरातील शेतकऱ्यांना झाला होता. तसेच या कामाची पाहणी जिल्हाधिकारी सौरभ राव यांनी कौतुक केले होते, अशी माहिती मोरडे फूड्सचे संदीप एरंडे यांनी दिली.

मोरडे फूड्स कंपनीच्या अधिकाऱ्याचे यावेळी शाल-श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले.ग्रामस्थांच्या वतीने खोलीकरणासाठी मशिनरी उपलब्ध करून दिल्याबद्दल आभार मानण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य चेतन थोरात, सुमन थोरात, अरुणा थोरात, जालिंदर थोरात, महेश दैने, रामभाऊ थोरात, सोपान थोरात, तसेच मोरडे फूड्स कंपनीचे वरिष्ठ अधिकारी, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत सिद्धेश थोरात यांनी केले तर आभार देविदास थोरात यांनी मानले.

सुप्रसिद्ध अभिनेते विनोद खन्ना यांचे निधन

मुंबई (प्रतिनिधी) : हिंदी चित्रपट सृष्टीतले सुप्रसिद्ध अभिनेते विनोद खन्ना यांचे मुंबईत आज (गुरुवारी) सकाळी निधन झाले. ते ७० वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती अस्वस्थ होती. त्यांच्यावर मुंबईतील रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र, आज अखेर त्यांची प्राणज्योत मालवली.

विनोद खन्ना यांचा जन्म ६ ऑक्टोबर १९४६ मध्ये पेशावर येथे झाला. भारत पाकिस्तान फाळणीनंतर विनोद यांचे कुटुंब मुंबईमध्ये स्थायिक झाले. १९६८ मध्ये 'मन का मीत' या सिनेमातून विनोद खन्ना यांनी बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. या सिनेमात त्यांनी खलनायकाची भूमिका साकारली होती. त्यानंतर अनेक सिनेमात सहाय्यक अभिनेता आणि खलनायकी भूमिका करत त्यांनी आपला ठसा उमटवायला सुरुवात केली. १९७१ मध्ये 'हम तूम और वो' या सिनेमात त्यांनी पहिल्यांदा मुख्य अभिनेता म्हणून काम केले.

त्यानंतर त्यांचा 'हिरो'चा प्रवास सुरुच झाला. २०१५मध्ये आलेला 'दिलवाले' हा त्यांनी काम केलेला अखेरचा सिनेमा. १९९७मध्ये विनोद खन्ना राजकारणात सक्रीय झाले. भाजपाचे गुरुजासपुर, पंजाबचे खासदार म्हणूनही ते निवडून आले होते. विनोद खन्ना यांनी 'मेरे अपने', 'कुर्बानी', 'पूरब और पश्चिम', 'रेशमा और शेरा', 'हाथ की सफाई', 'हेरा फेरी', 'मुकद्दर का सिकंदर', 'अमर, अकबर, अँथोनी' यांसारख्या शानदार सिनेमात काम केले होते. विनोद खन्ना यांनी करिअरची सुरुवात निगेटिव्ह भूमिकेने केली होती. नंतर ते हिरो बनले. विनोद खन्ना यांनी १९७१ च्या 'हम तुम और वो' मध्ये प्रमुख भूमिका साकारली.

सीबीएसई शाळांची मुजोरी बंद करणार

प्रकाश जावडेकर

पुणे (प्रतिनिधी) : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाशी (सीबीएसई) संलग्न शाळांवर नियंत्रणासाठी स्वतंत्र यंत्रणा नाही. त्यामुळे या शाळांकडून शासकीय अधिकाजयांनाही प्रवेश दिला जात नाही. अवाजवी शुल्क आकारणी केली जाते. यापुढे हे चालू देणार नाही. सीबीएसई शाळांची ही मुजोरी बंद करून त्यांच्यावर नियंत्रणासाठी यंत्रणा निर्माण करण्याचा विचार आहे, असे मनुष्यबळ विकास मंत्री प्रकाश जावडेकर यांनी स्पष्ट केले.

मनुष्यबळ विकास मंत्रालय, शालेय शिक्षण आणि सारक्षता विभागाच्या वतीने आयोजित दोन दिवसीय विभागीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मनुष्यबळ विकास विभागाचे सचिव अनिल स्वरूप, सह सचिव अजय तिरके, राज्याचे शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव नंदकुमार यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते. बालेवाडी येथे सुरू झालेल्या या कार्यशाळेमध्ये महाराष्ट्रासह गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, दीव प दमण तसेच दादरा नगर हवेली या राज्य व केंद्र शासित प्रदेशांतील शालेय शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

संबंधित राज्यांमध्ये सुरू असणारे शिक्षण क्षेत्रातील नाविन्यपुर्ण उपक्रम, प्रयोगशील शैक्षणिक गुणवत्ता वाढीचे कार्यक्रम यांचे सादरीकरण होणार आहे. तसेच प्रत्येक राज्याच्या वैशिष्ट्यपुर्ण ठरलेल्या शैक्षणिक कार्यक्रमांची देवाण घेवाण होणार आहे.

जावडेकर म्हणाले, देशात सीबीएसईच्या सुमारे १८ हजार शाळा आहेत. मंडळाची संलग्नता घेतल्यानंतर या शाळांना कसलेही बंधन राहत नाही. शासकीय अधिकारी शाळेत जावू शकत नाही. विद्यार्थ्ययांकडून मोठे शुल्क घेतले जाते.

या शाळांवर नियंत्रणासाठी मंडळाकडे स्वत:ची यंत्रणा नाही. शिक्षणामध्ये खासगी शाळेंचे महत्व आहे. पण गुणवत्तेच्या पातळीवर शासकीय आणि खासगी शाळांची निकोप स्पर्धा व्हायला हवी. सर्वसामान्य मुलांना खासगी शाळांमध्ये सहज शिक्षण घेता यायला हवे. त्यासाठी या शाळांमध्ये वाजवी शुल्क असायला हवे. त्यामुळे सीबीएसई शाळांची सध्याची व्यवस्था बंद केली जाईल.

इंग्रजीच्या वाढत्या प्रभावामुळे सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या ४ टक्के कमी झाली असून खासगी शाळांमध्ये ८ टक्के वाढ झाली आहे. हे चित्र चिंताजनक असले तरी सरकारी शाळांची स्थिती सुधारून त्या खासगी शाळांप्रमाणेच सक्षम केल्या जातील. मागील दहा वर्षांत शिक्षणाची स्थिती खुप खालवली आहे.

यापुढील काळात प्रत्येक घटकांवर जबाबदारी निश्चित केली जाणार आहे. अध्ययनाचे निष्कर्ष तयार करण्यात आले असून त्याचे सर्व शाळांमध्ये पालन करावे लागेल, असे जावेडकर यांनी नमुद केले.

■ अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची पुन्हा परीक्षा

शिक्षण हक्क कायद्यानुसार (आरटीई) आठवीपर्यंत विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण केले जात नाही. पण काही राज्यांनी यावर नाराजी व्यक्त करून त्यात सुधारणा करण्याची मागणी केली होती. त्यानुसार पाचवी आणि आठवीच्या परीक्षा घेणे, विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण करण्याबाबतचा निर्णय राज्यांवर सोपविला जाणार आहे. तसेच अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना जुनमध्ये परीक्षा घेवून पुन्हा संधी दिली जाईल. त्यामुळे कमी विद्यार्थी अनुत्तीर्ण होतील. याविषयी आरटीईमध्ये बदल करण्याचे विधेयक संसदेच्या येत्या अधिवेशनात सादर केले जाईल, असे जावडेकर यांनी सांगितले.

पॅनकार्ड हे आधारकार्डसोबत लिंक करा; नाहीतर करावा लागेल पश्चाताप

नवी दिल्ली : केंद्र सरकारने देशभरातील नागरिकांना १ जुलै २०१७ पर्यंत पॅनकार्ड हे आधारकार्डसोबत लिंक करण्याचे आदेश दिले असून १ जुलैपर्यंत जर आधार कार्ड आणि पॅन कार्ड लिंक झाले नाही तर तुमचे पॅनकार्ड रिजेक्ट होऊ शकते. तुम्ही अशा स्थितीत चालू आर्थिक वर्षात इन्कम टॅक्स रिटर्न भरू शकणार नाहीत. कारण, इन्कम टॅक्स रिटर्न भरण्यासाठी पॅनकार्ड आणि आधार नंबर हे दोन्ही अनिवार्य करण्यात आले आहे.

अनेक व्यक्तींना आधारकार्डाशी पॅनकार्ड लिंक करण्यात अडचण निर्माण होत आहे. ज्यांच्या नावाच्या स्पेलिंगमध्ये काही चुका आहेत त्यांना या समस्येचा सामना करावा लागत आहे. पॅनकार्डवरील नावाचे स्पेलिंग आधारकार्डावरील नावाचे स्पेलिंगशी जुळले नाही तर असे कार्ड लिंक होत नाही. बँक खात्यातील नावाचे स्पेलिंग आणि आधारकार्डावरील नावाचे स्पेलिंग यात साम्य नसेल तर आधार आणि पॅन कार्ड लिंक होणार नाही.

ब्राम्हणाने आरक्षण घ्यावे आणि देशातच राहावे

रामदास आठवले

पुणे (प्रतिनिधी) : दलितांच्या आरक्षणाला धक्का न लावता ब्राम्हण, मराठा समाजाला पंचवीस टक्के आरक्षण द्यावे, अशी मागणी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा यांच्याकडे करण्यात आली आहे, अशी माहिती रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आरपीआय-रिपाइं) अध्यक्ष आणि केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी येथे दिली. ब्राम्हण समाजाला आरक्षण नसल्यामुळे ते परदेशात जात असतील तर त्यांनी आरक्षण घ्यावे आणि देशातच राहावे अशी प्रतिक्रियाही आठवले यांनी दिली.

केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची रविवारी येथील शासकीय विश्रामगृहात बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. उपमहापौर नवनाथ कांबळे, शहराध्यक्ष महेंद्र कांबळे, एम. डी. शेवाळे, हनुमंत साठे आदी यावेळी उपस्थित होते. 'ब्राम्हण समाजाला आरक्षण नसल्यामुळे या समाजातील मुले परदेशात जात आहेत, असे विधान महापौर मुक्ता टिळक यांनी नुकतेच केले होते. त्या संदर्भात आठवले म्हणाले की, ब्राम्हण समाजासह मराठा आणि अन्य उच्च वर्णियांना आरक्षण मिळावयास हवे. तशी मागणी यापूर्वीच मी केली आहे. त्यासाठी कोणाच्या आरक्षणाला धक्का लावण्याची आवश्यकता नाही. 'निवडणुकीत कोणत्या पक्षाच्या उमेदवारास निवडून द्यायचे याचा निर्णय मतदार घेतात. रिपाइं ज्या पक्षाची मैत्री करते त्या पक्षाच्या उमेदवारास दलितांची मते मिळतात. मात्र इतर समाजाची मते दलित उमेदवारास मिळत नाहीत. रिपाइंमध्ये सर्व जातीधर्मांच्या लोकांचा समावेश आहे. मात्र निवडणुकीत या सर्वांची मते उमेदवाराला मिळत नाही. त्यामुळे यापुढे रणनीतीमध्ये बदल करावा लागेल. मित्र पक्षांवरील अवलंबित्वही कमी करावे लागणार असून पक्षाचे जास्त उमेदवार निवडून येण्यासाठी गावपातळीवर पक्षाची संघटनात्मक बांधणी करण्यात येईल,' असेही आठवले यांनी स्पष्ट केले.

> **राणेंनी भाजपमध्ये यावे**
> काँग्रेस पक्षाचे नेते नारायण राणे भारतीय जनता पक्षामध्ये येण्याची आवश्यकता आहे. या पक्षात त्यांना चांगले भविष्य राहील, माझा त्यांना मित्रत्वाचा सल्ला आहे. पुढील किमान वीस वर्षे केंद्रात आणि राज्यात काँग्रेसची सत्ता येणार नाही असा दावाही त्यांनी केला.